इंग्रजी टंकलेखक/लिपिक-टंकलेखक/ लघुटंकलेखक/ लघुलेखक संवर्गाच्या सुधारीत दि.२४.३.२०१७ च्या अधिसूचनेसंदर्भात स्पष्टीकरण

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन परिपत्रक क्रमांकः टंलेप-२०१५/प्र.क्र.१७६/भाषा-२,
नवीन प्रशासन भवन, ८ वा मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: ७ जून, २०१७

वाचा:-

१) सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. टंलेप्र-१०८१/सीआर-३४४/वीस-ब, दि. ६.५.१९९१
२) या विभागाची समक्रमांकाची दि.२४.३.२०१७ ची अधिसूचना

शासन परिपत्रक:-

शासकीय सेवेतील इंग्रजी टंकलेखक/लिपिक-टंकलेखक/लघुटंकलेखक/लघुलेखक संवर्गाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.६.५.१९९१ च्या अधिसूचनेमध्ये दि.२४.३.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये सुधारीत करण्यात आली आहे. सदर सुधारीत अधिसूचनेमधील तरतुदींच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे-

दि.२४.३.२०१७ च्या सुधारीत अधिसूचनेतील तरतुदी अधिसूचनेच्या दिनांकापासून लागू आहेत. त्यामुळे नियुक्तीच्या चार वर्षाची परिगणना विचारात घेताना ज्या कर्मचा-यांकडे सुधारीत अधिसूचनेच्या दिनांकास विहित संधी उपलब्ध आहेत, त्यांनाच सुधारीत आदेशातील तरतुदी लागू राहतील. ज्या कर्मचा-यांच्या विहित संधीचा कालावधी सदर अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी पूर्ण झाला आहे त्यांना यापूर्वीच्या तरतुदीनुसार एतदर्थ मंडळाची परीक्षा देणे अनिवार्य आहे.

सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०६०८१६२६५४४९३३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Language Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=240bdeb5a8c04b434248c583b5e7f565fb8f4397eae617484fa00c420b9d8820, cn=Aparna Arvind Gawde
Date: 2017.06.08 16:23:58 +05'30'

(अपर्णा अ.गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा. मुख्यसचिव/ अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
५) सर्व विभागीय आयुक्त
६) सर्व जिल्हाधिकारी
७) सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
८) प्रबंधक उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई (पत्राने)
९) प्रबंधक उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने)
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने)
१२) लोकायुक्त/उप लोकायुक्त, मुंबई (पत्राने)
१३) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) मा.मंत्री, मराठी भाषा यांचे विशेष कार्य अधिकारी
१८) सर्व मंत्रालयीन विभाग
१९) भाषा संचालक, भाषा संचालनालय, वांद्रे (पूर्व), मुंबई
२०) सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई
२१) सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई
२२) संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
२३) सर्व विभागीय सहायक भाषा संचालक, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नवी मुंबई
२४) निवड नस्ती (भाषा-२)

सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणावे.